MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१२० | बुधवार दि.१५ जानेवारी २०२५ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -120 | WEDNESDAY DT.15 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |



## चोरट्यांच्या हल्ल्यात तिघेजण गंभीर जखमी, आष्टी तालुक्यातील धनगरवाडी येथील घटना

आष्टी ।प्रतिनिधी

घरातील पत्र्याची पेटी व रोख पाच हजार रुपये चोरून नेतांना मालकाला जाग येताच चोरट्यांना अडवण्याचा प्रयत्न केला असता चार चोरट्यांनी धारदार चाकूने हातावर व पाठीवर वार करून घरातील तिघांना गंभीर जखमी केले ही घटना १२ जानेवारी रोजी पहाटे तीन च्या दरम्यान धनगरवाडी येथील गावडे वस्तीवर घडली याप्रकरणी रोहित भोसले राहणार(( लोणी ),वैभव बंग्या काळे, शहाण्या बंग्या काळे, चिमणु बग्या काळे राहणार (पिंपळा तालुका आष्टी )या विरुद्ध अंभोरा पोलीस ठाण्यात सोमवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे आष्टी तालुक्यातील धनगरवाडी येथील गावडे वस्तीवरील कैलास दगडू गावडे यांच्या राहत्या घरात रविवारी पहाटेच्या दरम्यान चार चोरटे घुसले घरातील पत्रेची पेटी व रोख पाच हजार रुपये घेऊन जात होते त्याचवेळी जाग आल्याने कैलास यांनी चौघांना आडविल्याचे प्रयत्न केला परंतु चोरट्याने कैलास दगडू गावडे, विकास गावडे ,छाया कैलास गावडे ,यांच्या हातावर पाठीवर मनगटावर धारदार चाकूने वार करून गंभीर जखमी केले याप्रकरणी १३ जानेवारी रोजी आरोपी रोहित भोसले राहणार लोणी,वैभव बंग्या काळे , शहाण्या बंग्या काळे, चिमण्या बंग्या काळे ,राहणार पिंपळा तालुका आष्टी यांच्यावर भा, न्या,स, ३०९ (६) व ३(५). नुसार गुन्हा दाखल असून पुढील तपास उपनिरीक्षक चंद्रकांतावरे करीत आहेत

# एसआयटीने कोर्टात वाल्मिक कराडला उघडा पाडला

## सगळे पुरावे बाहेर काढले, हत्येच्या दिवशीही सरपंचांना धमकी दिल्याचे उघड



बीड: मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणात मकोका लागलेल्या वाल्मिक कराड याला बुधवारी बीड येथील न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी विशेष तपास पथकाचे अधिकारी अनिल गुजर यांनी वाल्मिक कराडच्या १० दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली. यावेळी अनिल गुजर यांनी न्यायालयासमोर संतोष देशमुख यांच्या हत्येचा घटनाक्रम मांडला.

९ डिसेंबरला केज तालुक्यात संतोष देशमुख यांची हत्या झाली होती. ३ ते ३.१५ दरम्यान संतोष देशमुख यांचे अपहरण झाले होते. त्यादिवशी दुपारी ३.२० ते ३.३० दरम्यान दहा मिनिटात सुदर्शन घुले, विष्णू चाटे आणि वाल्मिक कराड यांचे फोनवरून संभाषण झाले होते, अशी माहिती एसआयटी अधिकारी अनिल गुजर यांनी कोर्टाला दिली. संतोष देशमुख यांच्या अपहरणाची वेळ आणि या तिघांच्या फोनवरील संभाषांची वेळ मिळतीजुळती असल्याचेही अनिल गुजर यांनी सांगितले. सुदर्शन घुले, विष्णू चाटे आणि वाल्मिक कराड या तिघांमध्ये ९ डिसेंबरला काय तपास झाला, याचा तपास करायचा आहे. त्यामुळे वाल्मिक कराड याची १० दिवसांसाठी पोलीस कोठडी देण्यात यावी, अशी मागणी एसआयटीने केली आहे. यावर आता न्यायालय काय निकाल देणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

### आरोपीसाठी शहर बंद ठेवायचं, आरडाओरडा करायचा हा नवीन परळी पॅटर्न, सुरेश धसांचा आरोप

बीड : एखादा आरोपी जर गुन्ह्यात सापडला, त्याला पोलिसांनी ताब्यात घेतला तर त्याच्यासाठी शहर बंद ठेवायचं, आरडाओरडा करायचा हा आता नवीन परली पॅटर्न असल्याचा आरोप भाजपचे आमदार सुरेश धस यांनी केला. परळी बंद करणारे हा फक्त चार पाच टक्के लोकांचा गुंडवाद आहे असा आरोपही त्यांनी केला. आता फक्त आका सापडला आहे, त्याच्या पुढे अजून अनेकजण सापडतील असं धस म्हणाले. वाल्मिक कराडवर मकोका लावल्यानतंर त्याच्या विरोधात कराड समर्थक आक्रमक झाले आणि मंगळवारी त्यांनी परळी बंद ठेवली. त्यावर प्रतिक्रिया देताना आमदार सुरेश धस म्हणाले की, हा जातीयवाद नाही तर हा चार पाच टक्के लोकांचा गुंडवाद आहे. कोणत्याही गुन्हेगाराला ताब्यात घेतलं तर शहर बंद वायचं, दुकानं बंद ठेवायची हा नवीन परळी पॅटर्न आहे. पण यामुळे व्यापाऱ्यांचंच नुकसान होणार आहे.

एसआयटीकडून वाल्मिक कराड याच्यावरील गुन्ह्यांची यादी न्यायालयात सादर

वाल्मिक कराडवर यापूर्वी दाखल झालेल्या गुन्ह्यांची लिस्ट कोर्टात सरकारी पक्षाकडून सादर करण्यात आली. इतर आरोपींविरोधातही दाखल गुन्ह्यांची माहिती दिली. चउजउ- कसा लावण्यात आला याचा संदर्भ एसआयटीकडून देण्यात आला. इतर आरोपीविरोधही दाखल गुन्ह्यांची माहिती एसआयटीने न्यायालयात दिली. वाल्मिक कराडने हत्येच्या दिवशीही संतोष देशमुखांना धमकी दिल्याचा धक्कादायक दावा देखील एसआयटीने केला आहे. वाल्मिक कराडच्या पोलीस कोठडीसाठी एसआयटीने ९ ते १० ग्राउंडस मांडली. दरम्यान कोर्टातला युक्तिवाद हा ऑन कॅमेरा सुरु आहे. कोर्टरूममध्ये केवळ दोन्ही पक्षाचे वकील, आरोपी, तपासअधिकारी हेच उपस्थित आहेत.

न्यायालयात डखढ तर्फे तपासअधिकारी अनिल गुजर यांनी तपासाची कोणती माहिती दिली?संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी हत्या झाली. त्यादिवशी दुपारी ३.२० ते ३.३० दरम्यान दहा मिनिटात सुदर्शन घुले, विष्णू चाटे आणि वाल्मिक कराड यांचे फोनवरून संभाषण झाले, अशी एसआयटीने बीड जिल्हा न्यायालयात सुनावणीदरम्यान माहिती दिली. तसेच वाल्मिक कराड, विष्णू चाटे आणि सुदर्शन घुले यांच्यात त्या दिवशी नेमकं काय बोलणं झाला याचा तपास करायचा आहे. संतोष देशमुख यांच्या अपहरणाची वेळ आणि य तिघांच्या फोनवरील संभाषांची वेळ मिळतीजुळती आहे. त्यामुळे वाल्मिक कराडच्या दहा दिवसाच्या कोठडीची मागणी एसआयटीकडून करण्यात आली.

आरोपीचे वाल्मिक कराडचे वकील सिद्धेश्वर ठोंबरे यांनी कोणता युक्तिवाद केला?

कुठल्याही आरोपीने वाल्मिक कराडचे नाव घेतले नाही.वाल्मिक कराड विरोधात कुठलाही ठोस पुरावा नाही. वाल्मिक कराड वर हत्येचा गुन्हा लागू होऊ शकत नाही. वाल्मिक कराड यांची अटक बेकायदेशीर आहे, असा युक्तिवाद वाल्मिक कराडचे वकील सिद्धेश्वर ठोंबरे यांनी केला.

## मस्साजोग प्रकरणातील गुन्हेगारांना शिक्षा झालीच पाहिजे, पण यामध्ये कोणी राजकारण आणू नये- माजी आ.भीमराव धोंडे

आष्टी (प्रतिनिधी )

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील गुन्हेगारांना शिक्षा झालीच पाहिजे, पण यामध्ये कोणी राजकारण आणू नये असे मत माजी आ. भीमराव धोंडे यांनी व्यक्त केले. मस्साजोग प्रकरणी माजी आ.भीमराव धोंडे यांना कडा येथे पत्रकारांनी विचारले असता त्यांनी आपले मत व्यक्त केले.याविषयी पुढे बोलताना धोंडे म्हणाले की, गुन्हेगाराला कोणतीही जात-पात नसते.गुन्हेगार हीच त्याची जात असते.ज्या पद्धतीने सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या झाली आहे ते अत्यंत दुर्दैवी घटना आहे. माणुसकीला काळीमा फासणारी गोष्ट आहे. यामध्ये सहभागी असणाऱ्या गुन्हेगारांना मग ते कोणीही असोत त्यांना कठोर शिक्षा ही झालीच पाहिजे असे आपले स्पष्ट मत असल्याचे माजी आ.भीमराव धोंडे यांनी सांगितले.



पुढे बोलताना माजी आ. भीमराव धोंडे म्हणाले की, याविषयी कोणी राजकारण करत असेल तर ते करू नये राजकारणासाठी वेगवेगळे अनेक व्यासपीठ आहेत.विकासाच्या मुद्द्यांवर राजकारण करण्यात यावे परंतु अशा संवेदनशील विषयांमध्ये राजकारण करून समाजा - समाजामध्ये तेढ निर्माण होईल अशी कोणतेही वक्तव्य अथवा कृती कोणाकडूनही होऊ नये कारण गुन्हेगाराला कोणत्याही समाजाचे कधीच पाठबळ नसते, त्यामुळे त्यांच्या गुन्हेगारी कर्तव्याला कोणताही समाज जबाबदार नसतो.काही गुन्हेगारांच्या कृतीमुळे समाजा -समाजामध्ये दुरावा निर्माण करणे ही चांगली बाब नाही.

गेल्या काही दिवसांपासून मीडियावर बीडचा बिहार होतोय अशा आशयाच्या बातम्या झळकवल्या जात आहेत अशा बातम्यांमुळे बीड जिल्ह्याची राज्यभर नव्हे तर देशात बदनामी होत आहे. ती कृपया थांबवावी. अशा बातम्यांना खतपाणी घातले जाणार नाही याची जिल्ह्यातील राजकीय लोकांनी दक्षता घ्यावी अशी सूचनाही माजी आ. धोंडे यांनी केली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संदर्भात सी.आय.डी.,एस.आय.टी.नेमलेली आहे तसेच गुन्हेगारांना मोकका लावला आहे. संबंधित यंत्रणेवर सर्वांनी विश्वास ठेवावा विना हस्तक्षेपाचे त्यांना काम करून द्यावे असे भीमराव धोंडे यांनी सांगितले.

## श्रीक्षेत्र भगवानगडावर श्री संत भगवानबाबांचा पुण्यतिथी निमित्त भाविकांची मांदियाळी

### मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गोविंदजी सानप यांचा भगवानगड ट्रस्टतर्फे विशेष गौरव

**समाधी दर्शनासाठी लांबपर्यंत रांगा ट्रॅक्टर मधुन बुंदी व चिवड्याचा महाप्रसाद वाटप महाप्रसादाची महापंगत हेलिकॉप्टर मधुन पुष्पवृष्टी**

शेवगाव प्रतिनिधी : बाळासाहेब खेडकर देशातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र भगवानगडाचे संस्थापक ऐश्वर्यसंपन्न संत श्री भगवानबाबा यांचा पुण्यतिथी सोहळा आज श्री क्षेत्र भगवानगडासह पूर्ण देशभर भव्य दिव्य स्वरूपात संपन्न झाला. गडाचे महंत डॉ . नामदेव शास्त्री यांच्या किर्तनानंतर महाप्रसादाची महापंगत झाली ,समाधी दर्शनासाठी भाविकांच्या लांब रांग लागल्याचे चित्र दिसून आले .भगवान बाबा कि जय या जयजयकाराच्या जयघोषाने गड दुमदुमून गेला होता .

देशातील अध्यात्मिक क्षेत्रामध्ये नामांकित असलेले श्री क्षेत्र भगवानगड हे ऊसतोड कामगारांचे श्रद्धास्थान म्हणून ओळखले जाते. गडाचा जवळपास सत्तर टक्के भक्तवर्ग हा ऊसतोड कामगार व सामान्य कष्टकरी शेतकरी आहे. या ऊसतोड कामगारांच्या अपार श्रद्धेमुळे आणि गडाचे विद्यमान मठाधिपती ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री यांच्या कुशल मार्गदर्शनामुळे भगवानगड हे देशातील एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र बनले आहे. गडावरील ज्ञानेश्वरी विद्यापीठ, विद्यार्थी वस्तीगृह आणि दररोजचे मोफत अन्नदान ही भगवानगडाची वैशिष्ट्ये आहेत. शास्त्रीजी गादीवर बसल्यापासून भगवानगडाचा मोठ्या प्रमाणात अध्यात्मिक आणि भौतिक कायापालट झाला आहे. विशेष म्हणजे जी ज्ञानेश्वरी श्री संत भगवानबाबा पाण्यावर बसून वाचत होते तीच ज्ञानेश्वरी आज गडाचे मठाधिपती न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे अतिशय सोप्या भाषेमध्ये जगाला समजावून सांगत आहेत.



सकाळी ठीक नऊ वाजता वै.श्री संत भगवानबाबांच्या समाधीची महापूजा करण्यात आली . दुपारी बारा ते दोन या वेळेत श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांचे अमृततुल्य काल्याचे किर्तन संपन्न झाले. कीर्तना नंतर उपस्थित लाखो भाविकांना महाप्रसाद देण्यात आला या सोहळ्यासाठी राष्ट्रवादीचे प्रतापराव ढाकणे, भिमराव फुंदे, बाळासाहेब सानप, गडाचे विश्वस्त संत महंत राजकीय, धार्मिक सह विविध क्षेत्रातील मान्यवरासह राज्यभरातून भाविकानी हजेरी लावली होती

## शाळेसाठी भंगार एसटी महामंडळाच्या बस रस्त्यावर; विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ?

नेकनुर ।प्रतिनिधी

परिवहन विभागाच्या काही बस या भंगार अवस्थेत निघाल्या आहेत. यामुळे चालकाच्या आरोग्याला धोका निर्माण होतो. शिवाय भंगारात जाण्याऱ्या बस रस्त्यावर धावत असल्यानं प्रवाशांच्या आणि विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका असतो. आज बाळनाथ विद्यालय चाकरवाडी या शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी ने - आण करणारी बस भंगार अवस्थेत असणारी बस आहे. शिवाय भंगारात जाण्याऱ्या बस रस्त्यावर धावत असल्यानं प्रवाशांच्या जीवाला धोका असतो. परिवहन विभाग याला गांभीर्याने घेताना दिसून येत नाही. भंगार, नादुरुस्त बस रस्त्यावर



एसटी महामंडळाच्या भंगार बसेसचा मुद्दा सातत्याने ऐरणीवर येत आहे. एसटी महामंडळाच्या भंगार आणि नादुरुस्त बसेसमुळे अनेक ठिकाणी अपघातांच्या घटना घडत आहेत. शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी सोडली जाणारी बस भंगार अवस्थेतलीच बस आहे. शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी दररोज भंगार मधली बसच पाठवली जाते. या बस मधून विद्यार्थ्यांना जीवघेणा प्रवास सुद्धा करावा लागतो. कधी खिडकी नाही तर कधी त्या बसच्या खिडकीला काचे सुद्धा नाहीत. यामुळे लहान विद्यार्थी खिडकीमधून डोकावत सुद्धा असतात. परंतु आज शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी सोडल्या जाणारे बसचे वरील छतच उडून गेले आहे. यामुळे आता विद्यार्थी शाळेत वेळेवर पोहोचणार नाहीत. शाळेच्या होणाऱ्या नुकसानीस परिवहन मंडळ जबाबदार राहणार का यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. परंतु गेल्या अनेक दिवसांपासून शाळेसाठी कधी बस येते तर कधी नाही यासाठी अनेक वेळा संबंधित तिडके अधिकारी असणारे यांना शाळेचे मुख्याध्यापक जगताप सर यांनी तक्रार केली असता त्यांनी या तक्रारीला केराची टोपली दाखवल्याचे सुद्धा शाळेचे मुख्याध्यापक यांनी बोलताना म्हटले आहे. सतत शाळेसाठी भंगार बस आणि नादुरुस्त बसच पाठवली जाते. जर एखाद्या वेळेस शाळेसाठी येणारी बस ना दुरुस्त असेल भंगार असेल आणि या बसमधून विद्यार्थी जर प्रवास करत असतील तर दुर्घटना घडलीच तर परिवहन महामंडळ जबाबदार राहणार का ?

## परळी व सिरसाळा आदोलन कडकडीत बंद :वाल्मीक कराड याच्यावर खोट्या गुन्ह्याच्या निषेधार्थ

### १५ जानेवारी २०२५ रोजी कडकडीत बंद

सिरसाळा प्रतिनिधी.दिनांक १४ जानेवारी वाल्मीक कराड याच्यावर वारंवार दाखल होत असलेल्या खोट्या गुन्ह्याच्या विरोधात निषेधार्थ १५जानेवारी२०२५ रोजी कडकडीत बंद ठेवण्यातचे आव्हान करण्यात आले आहे. तसे निवेदन देखील सिरसाळा पोलीस स्टेशनला देण्यात आले आहे. स्थानिक नागरिकाच्या वतीने याबाबद पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले आसुन. प्रशासनाने त्वरीत कारवाई करून वाल्मीक कराड याच्या वरील खोटे गुन्हे परत घेण्याची मागणी केली आहे. सिरसाळा बंद आंदोलनाचे आयोजन करणार्या नागरिकांचे म्हणे आहेकी वाल्मीक कराड याच्या विरोधातील गुन्हे चुकीचे आसुन ते त्याच्यावर अन्याय करत आहेत. यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे.त्यानी प्रशासनाला चेतावणी दिली आहे की. कडकडीत बंद नतर ही गंभीर आणी त्वरीत कार्यवाही केली गेली नाही. तर हे आंदोलन अधिक तीव्र होईल आसे. निवेदनात प्रशासनाला दिलेल्या सूचनांमुळे या



प्रकरणाची गंभीर दखल घेऊन योग्य कारवाई करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.आदोलन करणाऱ्यांनी सिरसाळा बंद दरम्यान कोणत्याही प्रकारच्या गोंधळ किवा हिंसाचारापासून दूर राहाण्याचे आश्र्श्रासन दिले आहे. तरी ही प्रशासने यावर त्वरीत हस्तक्षेप करावा. आशी अपेक्षा व्यक्त केली आहे. यावेळी सिरसाळा परिसरातील औबीसी सामाजा याच्याकडून सिरसाळा पोलीस स्टेशनचे एपीआय. गोरखनाथ दहिफळे याना निवेदन देण्यात आले आहे.या वेळेस उपस्थित चदु भैया कराड. बाबासाहेब काळे. उपसरपंच नगरसेवक नयुम भैय अक्षय दळवी सितलदास आरसुळे रवी बढे या वेळी उपस्थित होते.

सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )


# कायदा हातात घेणारांवर गुन्हे दाखल

बीड ।प्रतिनिधी

मस्साजोग ता. केज येथे घडलेल्या घटनेवरुन दाखल गुन्ह्याचा तपास सुरु असतांना आज दिनांक १४/०१/२०२४ रोजी १३:३० ते १५:०० वा. दरम्यान परळी बीड रोडवर पांगरी कॅम्प, वान नदीचे पुलावर व टोकवाडी तसेच कन्हेरवाडी येथील नदीचे पुलावर सार्वजनीक रस्त्यावर वाल्मीक कराड यांचे समर्थनार्थ कोणीतरी अज्ञात इसमांनी टायर जाळुन सार्वजनीक रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा निर्माण केला म्हणुन पोलीस स्टेशन परळी ग्रामीण चे पोलीस निरीक्षक श्री. सय्यद, सपोनि. अनमोल केदार, सपोनि श्री. समाधान कवडे व त्यांचे स्टाफ यांनी तात्काळ दखल घेवुन सार्वजनीक वाहतुक सुरळीत करुन आरोपींविरुद्ध कलम १२६ (२) भारतीय न्याय संहीता २०२३ प्रमाणे गुन्हे नोंद केलेले असुन सदर गुन्ह्यातील आरोपींविरुद्ध कठोर कायदेशीर कार्यवाही केली जाणार आहे.

तसेच परळी शहरातील रिलायन्स पेट्रोलपंपासमोर सार्वजनीक रस्त्यावर परळी ते संगम जाणारे रोडवर वाल्मीक कराड यांचे समर्थनार्थ कोणीतरी अज्ञात इसमांनी टायर जाळुन सार्वजनीक रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा निर्माण केला म्हणुन पोलीस निरीक्षक श्री. धनंजय ढोणे व त्यांच्या स्टाफने तात्काळ दखल घेवुन सार्वजनीक वाहतुक सुरळीत करुन आरोपींविरुद्ध कलम १२६ (२) भारतीय न्याय संहीता २०२३ प्रमाणे गुन्हे नोंद केलेले असुन सदर गुन्ह्यातील आरोपींविरुद्ध कठोर कायदेशीर कार्यवाही केली जाणार आहे.तरी परळी शहर व परीसरातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, मा. जिल्हाधीकारी बीड यांचे आदेश जा.क्र. २०२३/गृह विभाग/प्र.कार्यवाही/१/१/म.पो.अ. कलम १९५१/१४ प्रमाणे दिनांक १३/०१/२०२५ रोजीपासुन जमावबंदी आदेश लागु झालेले असुन त्याचे उल्लंघन करणाऱ्या इसमांविरुद्ध कठोर कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार आहे याची सर्व नागरीकांनी नोंद घ्यावी.

# दीनदयाळ बँकेच्या व्याख्यानमालेचा समारोप

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने युगपुरूष स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्तच्या प्रबोधनपर व्याख्यानमालेचा समारोप दापोली येथील सुप्रसिध्द विचावंत भिकुजी दादा इदाते यांच्या ' सामाजिक आचार संहितेची गाथा - संविधान' या विषयावरील व्याख्यानाने झाला. यावेळी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा,बँकेचे अध्यक्ष ऍड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ऍड.राजेश्वर देशमुख, संचालक रा.गो.धाट, संचालिका शरयू हेबाळकर,बिपीन क्षिरसागर, बाळासाहेब देशपांडे, तज्ज्ञ संचालक ऍड.अशोक कुलकर्णी, मकरंद सोनेसांगवीकर, जयकिरण सुरेश कांबळे शरयु हेबाळकर, प्रख्यात कवी प्रभाकर साळेगांवकर ड. विवेक वाकेकर, व मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर आदी उपस्थित होते.




भिकुजी इदाते यांनी सांगितले की,लोकमान्य टिळकांनी शिवजयंती गणेशोत्सवातून समरसतीचा प्रयोग केला भारत देशात लाल बाल पाल यांनी स्वतंत्र विषयाची जागृती निर्माण केली अरविंद सरस्वती सर्वांच्या सहमतातून १८९५ मध्ये भारतीय संविधानाची १११ कलम तयार झाली देशातील प्रेरणादायी अशा महनीय व्यक्तींनी भारतीय समाजाच्या उत्थानासाठी विविध सामाजिक विधायक प्रयोग केले भारतीय संविधानाचा आदर वाढेल असेच कार्य करावे असेही त्यांनी सांगितले. तर समारोपपर मनोगत व्यक्त करताना बँकेचे अध्यक्ष ॲड. मकरंद पत्की यांनी सांगितले की, व्याख्यानमालेत विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींनी रसिकांना वैचारिक मेजवानी देवून वेळोवेळी आपले अनमोल विचार मांडले आहेत.

आनंद देशपांडे यांनी पद्य सादर केले.

पाहुण्यांचा परिचय ऍड. अशोक कुलकर्णी यांनी तर संचालन मकरंद कुलकर्णी व उपस्थितांचे आभार उपाध्यक्ष ऍड.राजेश्वर देशमुख यांनी मानले.विविध क्षेत्रातील मान्यवर, अंबाजोगाई शहर व परिसरातील श्रोते, महिला,ज्येष्ठ नागरिक, आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# राष्ट्रीय महामार्गावर पाडळसिंगी येथे आज रस्ता सुरक्षा सप्ताह निमित्त वाहनांना रिफ्लेक्टर लावण्यात आले

बीड (प्रतिनिधी)

दिनांक, १०/०१/२०२५ रोजी महामार्ग पोलीस केंद्र गेवराई हद्दीतील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वर गढी शिवारातील जय भवानी साखर कारखाना गढी येथे रस्ता सुरक्षा सप्ताह अभियान अंतर्गत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. वाहतुकीचे नियम सांगून ट्रॅक्टरला व बैलगाडी ला रिफ्लेक्टर लावणे बाबत, जेणे करून रात्रीच्या वेळी बैलाच्या शिंगांना रेडीयम लावण्यात यावे, रस्त्याने चालत असताना सव्हिर्स रोडचा वापर करावा महामार्ग वर डाव्या बाजुनू ऊसाने भरलेले वाहन चालवावे व ट्रॅक्टर चालक यांनी टेपचा आवाज कमी करावा.जेणे करून पाठीमागील वाहनांचा आवाज तुमच्या पर्यंत येईल वापरणे दारू पिवून वाहन चालू नये.जर उसाची ट्रॉली पलटी झाली तर १०८ महामार्ग पेट्रोलिंग यांना तात्काळ कळवतील.जेणे करून वाहतूक कोंडी होणार नाही.अपघात न होण्यासाठी घ्यावयाची काळजी तसेच अपघातग्रस्तांना मदत करने मदत



केल्यास तुम्हाला पोलीसा कडून कोणतीही अडचण येणार नाही तसेच अपघात संबंधाने मा सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशा बाबत चालक व प्रवासी यांना माहिती दिली या वेळी आम्ही सोबत पोह-१६४६ म्हेत्रे,पोना -८९९ गडदे ,चापोह -२०५० जमशेटे हजर होते व कारखान्यावरील ५० ते ६० चालक व ऊस तोड कामगार हजर होते.

# स्व.संतोष देशमुखांना न्याय देण्यासाठी लढणा- या योद्ध्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी लिंबागणेश येथे दुग्धाभिषेक

बीड (प्रतिनिधी)

मस्साजोगचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांना न्याय मिळावा अमानुष हत्याकांडातील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी लोकशाही मार्गाने रस्त्यावरील लढाई लढणाऱ्या मराठा आरक्षण योध्दा मनोजजी जरांगे पाटील आणि सभागृहात लढाई लढणारे आ. सुरेश आण्णा धस, आ.संदिप क्षीरसागर,आ. जितेंद्र आव्हाड आणि जिल्ह्यात सक्रिय असणारे राजेंद्र मस्के यांच्या प्रतिमेची काल दि.१४ मंगळवार रोजी वाल्मिक कराड यांना पोलीस प्रशासनाने मकोका अंतर्गत गुन्हा दाखल केल्यानंतर परळीतील वाल्मिक कराड समर्थकांनी गदारोळ करत सार्वजनिक ठिकाणी मनोजजी जरांगे पाटील, आ.सुरेश आण्णा धस, आ.संदिप क्षीरसागर,आ.जितेंद्र आव्हाड यांच्या प्रतिमेची विटंबना केली होती. वास्तविक पाहता लोकप्रतिनिधींनी स्व.संतोष देशमुख यांना न्याय मिळवण्यासाठी संविधानिक पद्धतीने सभागृहात व रस्त्यावर आवाज उठवला म्हणुन आज दि.१५ बुधवार रोजी सकाळी लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात बालाघाट परीसराच्या वतीने शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांच्या नेतृत्वात विक्की आप्पा वाणी, अशोक वाणी ,विनोद चौरे,गणेश वाणी,उमेश वाणी यांनी मनोज जरांगे पाटील व वरील लोकप्रतिनिधींच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक केला. जिल्हा प्रशासनाने जमावबंदीचे आदेश लागू केले असल्याने कायद्याचे उल्लंघन होऊ नये याची दक्षता




घेत केवळ ४ जणांनी यात सहभाग घेतल्याचे बाळासाहेब मोरे पाटील यांनी सांगितले

# जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे रब्बी हंगाम खत टंचाई संदर्भात

## खा.डॉ.कल्याणरावजी काळे यांच्या उपस्थितीत आढावा बैठक संपन्न

जालना ।प्रतिनिधी

दि.१३ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे खासदार डॉ.कल्यणरावजी काळे यांच्या उपस्थितीत रब्बी हंगाम खत टंचाई च्या संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली.सदर बैठकीत शेतकरी,कृषि निविष्ठा विक्रेते, शेतकरी संघटना यांच्या अडचणी व समस्यांबाबत चर्चा करून त्यावर उचित कार्यवाही करण्याच्या सूचना खासदार डॉ.कल्याणरावजी काळे यांनी दिल्या आहेत.तसेच खत कंपनीने लिंकिंग करु नये या बैठकीत उपस्थित खत कंपन्याचे प्रतिनिधी यांनाही सूचना देण्यात आल्या आहेत.सर्व घाऊक व किरकोळ विक्रेता यांनी देखील कंपन्यांकडून लिंकिंग बाबत विरोध करुन ठोस



भूमिका घेण्याची सूचना कृषि निविष्ठा विक्रेता संघटना यांना ही केली आहे.यावेळी जिल्ह्याच्या अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीमती रिता मेत्रेवार, निवासी जिल्हाधिकारी श्री.महाडिक , जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री.गहिनीनाथ कापसे, कृषि विकास अधिकारी श्री.प्रभाकर बनसावडे, मोहीम अधिकारी श्री.निलेशकुमार मदाने व कृषि विभागातील सर्व अधिकारी,खत कंपनीचे प्रतिनिधी,खत विक्रेता प्रतिनिधी, पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागनाथ देवस्थान मानूर येथे अखंड शिवनाम सप्ताहाची सांगता

मानूर / शाहेबाज पठाण

प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनामध्ये अनेक गोष्टी दान कराव्या लागतात आणि ते दान केल्यानंतर पुण्य प्राप्त होत असते. हेच दान अनेक पटीने करायचे असेल तर त्याव्यक्तीला मठसंस्थान किंवा गुरुस्थानाच्या ठिकाणी दान करावे लागते. त्यावेळी त्याचे पुण्य कैकपटीने फळास प्राप्त होते. असे प्रतिपादन श्री ष ब्र १०८ गुरु विरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज यांनी मानूरमधील सप्ताह सांगता प्रसंगी केले. श्रीमद् वीरसिंहासनाधीश्वर रेणुकशाखीय वीरगोत्रिय श्री नागनाथ देवस्थान जहागीरदार मठसंस्थान मानूरचे लिंगैक्य श्री ष ब्र १०८ गुरु विरूपाक्ष शिवाचार्य महाराज यांचे १९ वे पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त श्री तीर्थक्षेत्र नागनाथ देवस्थान जहागीरदार मठसंस्थान मानूर येथे अखंड शिवनाम सप्ताह,ग्रंथराज परमरहस्य पारायण व नित्य लघुरुद्राभिषेक सोहळा हा शनिवार दिनांक ४ ते ११ जानेवारी २०२५ या कालावधी संपन्न झाला. या



सप्ताहाची सुरुवात लिंगैक्य श्री श्री गुरुगिरी शिवाचार्य मानूरकर महाराज यांनी २००८ या सालापासून सर्व शिष्य व सद्भक्तांच्या सहभागातून सुरू केलेला हा सप्ताहास असून गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्र सह बाहेरील राज्यातून बिहार, गुजरात, कर्नाटक यासह अनेक राज्यातून शिष्य व सदभक्त मंडळी आपली उपस्थिती लावतात व आपली सेवा गुरुचरणी समर्पित करतात शिवनाम सप्ताहाच्या सांगताच्या एक दिवस अगोदर भव्य दिव्य पालखी व मिरवणूक संपन्न झाली. त्याचबरोबर या मिरवणुकीमध्ये संयुक्तपणे गुरुराज माऊली व विरूपाक्ष महाराज की जय, गुरु गिरी महाराज की जय असा जयघोष करत पाऊले खेळत अतिशय उत्साही व आनंदी वातावरणात संपन्न झाली. या मिरवणूकस हजारोंच्या संख्येने शिष्य सदभक्त व मानूर पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थ यांच्या उपस्थिती होती. यावेळी या शिवनाम सप्ताहस बार्शी परंडकर बृहन्मठाचे श्री ष ब्र १०८ सद्गुरू राचलिंग शिवाचार्य परंडकर महाराज यांनी मानूर येथील सप्ताहात मिळणारा आनंद म्हणजे स्वर्गामध्ये मिळणारा आनंद आहे म्हणून संबोधले, तर माढा येथून आलेले श्री ष ब्र १०८ सद्गुरू प्रभुदेव शिवाचार्य माढेकर महाराज यांनी आपल्या जीवनात गुरूस्थान किती महत्वाचे आहे हे स्पष्ट केले आणि मानवी जीवनात शिक्षणाप्रमाणे संस्काराला महत्त्व देणे गरजेचे आहे असे उपस्थितांना संबोधित केले. तसेच बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी श्री शिवकुमार स्वामी साहेब, दिव्य लोकप्रभाचे संपादक तथा मानूर गावचे भुमीपुत्र संतोषजी मानूरकर, दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी, मानूर येथील जेष्ठ नेते दशरथरावजी वनवे (दादा), रामदास बडे, आदीनाथ नागरगोजे, भारत पाखरे, बाळासाहेब शिरसाठ, कलंदर पठाण, जयशिंग शिरसाठ व अशा असंख्य लहानथोर मंडळींची उपस्थिती होती. त्याचबरोबर मठसंस्थानाचे हजारो शिष्य व सदभक्त या सोहळ्यास उपस्थित होते.या अखंड शिवनाम सप्ताहास ३६ स्वामींची महत्वपूर्ण उपस्थिती होती तसेच अन्नदात्यानी अन्नदान व सेवा करणाऱ्यांनी तन-मन-धनाने सेवा करत आपली सेवा गुरू माऊलीच्या चरणी समर्पित केली.

# राजमाता जिजाऊ वस्तीगृहात जिजाऊ जन्मोत्सव साजरा

मुखेड ।प्रतिनिधी

मुखेड( १२ जानेवारी) शहरातील नामांकित राजमाता जिजाऊ वस्तीगृहामध्ये १२ जानेवारी रोजी स्वराज्य जननी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याच दिवशी युवकांचे प्रेरणास्थान असलेले तेजस्वी व्यक्तिमत्व स्वामी विवेकानंद यांची जयंती ही उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त वस्तीगृहातील उपस्थित विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्टरित्या महामानवच्या जीवन चरित्रावर भाषणे केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दंतरोगतज्ञ डॉ. पांडुरंग श्रीरामे तर प्रमुख अतिथी म्हणून जि. प.प्रा शाळा जांभळीचे मुख्याध्यापक, सूर्यवंशी सर, केमिस्ट तालुकाध्यक्ष बाळानंद गबाळे, डॉ. सिद्धांत इंगोले, सहशिक्षक संतोष तळेगावे सर, ए. सी जाधव सर,प्रथम मान्यवराच्या हस्ते जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद प्रतिमेचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ वंदनेने करण्यात आली .तदनंतर वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी भाषणे केली. यामध्ये उत्कृष्ट भाषण करणाऱ्या विद्यार्थ्यास मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले. प्रथम बक्षीस मिळवणारा विद्यार्थी पांडुरंग रामदास वडेर, व द्वितीय पारितोषिक मिळवणारा विद्यार्थी, निरंजन वडजे तसेच तृतीय म्हणून ऋतुराज पाटील व उपस्थित सर्व भाषणे करणाऱ्या विद्यार्थ्यांना छोटेसे बक्षीस संचालक गंगाधर बिरादार सर यांच्या वतीने देण्यात आले. या सर्व विद्यार्थ्यांचे भाषणे संपल्यानंतर उपस्थित डॉ. सिद्धांत इंगोले सरांनी त्यांना मार्गदर्शन केले, तसेच तळेगावे सरांनी जिजाऊ माँसाहेब यांच्या जीवन चरित्रावरील काही महत्त्वपूर्ण गोष्टी सांगितल्या तसेच त्यांच्या आवडीची स्वप्नातली परी ही कविता म्हणून दाखवली या कविता म्हणताच सर्व मान्यवरांसह विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. विठ्ठलराव सूर्यवंशी सरांनी जीवनातील आईचे महत्व यावर सविस्तर मार्गदर्शन केले. समारोपर भाषणामध्ये डॉ. पांडुरंग श्रीरामे सर म्हणाले की विद्यार्थ्यांनी सोयी सुविधेपेक्षा आपल्या ध्येयाकडे अधिक लक्ष द्यावे आणि आपण ग्रामीण भागातले आहोत म्हणून न्यूनगंड न बाळगता परिश्रम घेऊन आलेल्या अडचणीला यशाची संधी समजून पाहिलं पाहिजे, आणि वेळेला महत्व दिलं पाहिजे ग्रामीण भागातील



विद्यार्थी सुद्धा, डॉक्टर इंजिनियर कलेक्टर व सर्व स्तरातील मोठे अधिकारी होऊ शकतात पण त्यासाठी जिद्द ,चिकाटी अधिकचे परिश्रम घेणे अतिशय गरजेचे आहे पण त्यानंतर तुम्ही कितीही मोठे व्हा ! अधिकारी व व्यवसायिक क्षेत्रातील उद्योजक व्हा ! पण तुमच्याकडे वक्तृत्व , बोलण्याची शैली नसेल तर तुम्ही त्या क्षेत्रात नावलौकिक मिळू शकत नाही. त्यामुळे आपल्यामध्ये बोलण्याची कला अवगत असणे अतिशय गरजेचं आहे त्यामुळे बिरादार सरांनी जी संधी तुम्हाला या ठिकाणी उपलब्ध करून दिलेली आहे त्या संधीचं तुम्ही सोनं केलं पाहिजे. या कार्यक्रमाचे आभार राजमाता जिजाऊ वस्तीगृहाचे संचालक गंगाधर बिरादार सर यांनी मानले व उपस्थित मान्यवरांनी आपला अमूल्य वेळ देऊन कार्यक्रमाला उपस्थिती लावल्याबद्दल मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी, नितीन पवार, गणेश टापरे माधव बोमनगे, सर्वच विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



अंबड - युवा सेनेचे सचिव अभिमन्यू खोतकर यांची वाढदिवसानिमित्त भेट घेऊन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संतोषराव मोहिते युवा सेनेचे जिल्हाप्रमुख अमोल ठाकूर, अजय कदम, उपजिल्हाप्रमुख गणेश मोहीते, आदित्य घुगे, सरपंच संदीप काळे यांची उपस्थिती होती.



आज मुंबई येथे देशाचे नेते आदरणीय मा. खा. शरदचंद्रजी पवार साहेब यांची पदवीधर संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. अमर शेख यांनी सदिच्छा भेट घेतली आणि पदवीधर युवकांचे करीत असलेल्या कार्याबद्दल सविस्तर माहिती दिली - प्रा. अमर शेख


# एमएमए राष्ट्रीय एलिट कॉम्बॅट २०२५ मध्ये बीडच्या शेख रबी अहमदला कांस्य पदक

अजमेर (वार्ता)

ऑल इंडिया मिक्स्ड मार्शल आर्ट्स फेडरेशन अधिकृत राष्ट्रीय एलिट कॉम्बॅट २०२५ अजमेर राजस्थान मध्ये, तीन दिवसीय स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी पॉइंट टेबलनुसार बीड महाराष्ट्रच्या फायटर मिलिया सीनियर कॉलेजचा विद्यार्थी शेख रबी अहमद अब्दुल रहीम याला कांस्य पदक देण्यात आले. हरियाणा मेवातच्या ऋषीविरुद्धच्या अटीतटीच्या सामन्यात त्याने १० ते ९ गुण मिळवले. हे स्पर्धा १० जानेवारी ते १२ जानेवारी २०२५ दरम्यान बेटल फिल्ड टर्फ, पुष्कर रोड, लक्ष्मी पॅलेस जवळ अजमेर येथे आयोजित करण्यात आले होते. पहिल्या फेरीत असताना शेख रबी अहमदला १० तर ऋषीला ८ गुण मिळाले. ऋषीने रबीवर टीकेओकडून गुण घेतले. त्यानंतर ऋषीला रौप्य आणि रबी अहमदला कांस्यपदक देण्यात आले. उपांत्य फेरीच्या सामन्याच्या शेवटी हा निर्णय घेण्यात आला. अंतिम सामन्यात हरियाणाच्या ऋषी याने दिल्लीच्या ऋषिकांतला गंभीर दुखापत होऊनही रौप्यपदक जिंकण्यात यश मिळविले, तर दिल्लीच्या ऋषिकांतने सुवर्णपदक पटकावले.

नॅशनल एमएमए फेडरेशनने आयोजित केलेल्या या एलिट कॉम्बॅटमध्ये देशभरातील विविध राज्यांतील एमएमए लढवय्ये सहभागी झाले होते.मिश्र मार्शल आर्ट एमएमएमध्ये बीड जिल्ह्याचे नाव लौकिक करणाऱ्या शेख रबी अहमदचे हे दुसरे राष्ट्रीय कांस्य पदक आहे. यापूर्वी त्याने पश्चिम बंगालमध्ये राष्ट्रीय कांस्यपदक जिंकले होते, तर महाराष्ट्र राज्य स्तरावर त्याने नागपुरात सुवर्णपदक जिंकले होते.





# आसारामला अंतरिम जामीन

जोधपूर : राजस्थान उच्च न्यायालयाने मंगळवारी २०१३ च्या लैंगिक अत्याचार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या आसारामला ३१ मार्चपर्यंत अंतरिम जामीन मंजूर केला. एका आठवड्यापूर्वी,सर्वोच्च आसारामला अत्याचाराच्या न्यायालयाने लैंगिक दुसऱ्या प्रकरणात ३१ मार्चपर्यंत जामीन मंजूर केला. आसाराम अनेक आजारांनी ग्रस्त आहे. न्यायमूर्ती दिनेश मेहता आणि न्यायमूर्ती विनीत कुमार माथुर यांच्या खंडपीठाने आसारामला अंतरिम जामीन मंजूर केला. या याचिकेचे स्वरूप सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेसारखे होते, असे खंडपीठाने सांगितले.

# जम्मू-काश्मीरमध्ये स्फोटात ६ जवान जखमी



जम्मू आणि काश्मीरमधील राजौरी जिल्ह्यातील नौशेरा सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ (डेउ) सुरुंग स्फोट झाल्याची मोठी घटना समोर आली आहे.समोर आलेल्या माहितीनुसार, 'लष्कराचे जवान गस्त घालत असताना अचानक स्फोट झाला. हा स्फोट आज सकाळी १०.४५ वाजता झाल. ही घटना घडली तेव्हा ५/३ गोरखा रायफल्स (ऋ्ठ) ची एक तुकडी खांबा किल्ल्याजवळ गस्त घालत होती.जखमींमध्ये हवालदार एम. गुरुंग (४१), हवालदार जे. थप्पा (४१), हवालदार जंग बहादूर राणा (४१), हवालदार आर. राणा (३८), हवालदार पी. बदर राणा (३९). हवालदार व्ही. गुरुंग (३८) हे सैनिक आहेत.अपघातात जखमी झालेल्या सर्व सैनिकांना उपचारासाठी राजौरी येथील १५० जनरल हॉस्पिटल (ऋ्क) मध्ये नेण्यात आले आहे. अहवालांनुसार त्यांची प्रकृती स्थिर आहे आणि त्यांना किरकोळ दुखापत झाली आहे.

# जातीय तेढ निर्माण करणारी पोस्ट केल्याने पोलिस कर्मचारी केला निलंबीत

## एसपी नवनीत कॉंवत यांची कारवाई

बीड जिल्ह्यात आगोदरच तणावाचे वातावरण असताना बीडमधील शिवाजीनगर ठाण्याच्या गोरख हाडुळे या पोलिस कर्मचाऱ्याने सोशल मीडियावर जातीय तेढ निर्माण करणारी पोस्ट केली. याची गंभीर दखल घेत पोलिस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी त्यांना तडकाफडकी निलंबित केले.

या कारवाईने पोलिस दलात खळबळ उडाली आहे. यामुळे सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट टाकून व्यक्त होणाऱ्या पोलिसांचे धाबे दणाणले आहेत. दरम्यान, हाडुळे यांची नियुक्ती शिवाजीनगर पोलिस ठाण्यात आहे. परंतु सध्या त्यांना एका पोलिस अधिकाऱ्याच्या बंगल्यावर सुरक्षा रक्षक म्हणून नियुक्त केलेले आहे. त्या ठिकाणी बसल्या जागी मोबाइलवरून त्यांनी ही पोस्ट केल्याचे सांगण्यात येत आहे.

# बुमराह ठरला सर्वोत्तम खेळाडू



दुबई: भारताचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह याने डिसेंबर महिन्यातील आयसीसी सर्वोत्तम क्रिकेटपटूचा पुरस्कार पटकावला. बुमराहने हा पुरस्कार पटकावताना ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स आणि दक्षिण आफ्रिकेच्या डेन पॅटरसन यांना मागे टाकले. नुकत्याच झालेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या बॉर्डर गावसकर चषक (बीजीटी) मालिकेत बुमराहने कमालीची कामगिरी केली. त्याने डिसेंबरमध्ये झालेल्या तीन कसोटीत १४.२२च्या शानदार सरासरीने २२ बळी घेतले होते.

# आपल्या पक्षाची कॉंग्रेस झाली आहे, भास्कर जाधवांची ऑडिओ क्लिप व्हायरल

विधानसभा निवडणुकीत निराशा हाती लागल्यानंतर आगामी पालिका, जिल्हा परिषद निवडणुकांसाठी नव्या उमेदीनं लढण्याचा प्रयत्न शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून केला जात आहे. मात्र पक्षातल्या एकंदर कार्यपद्धतीवर पक्षातूनच टीका होऊ लागली आहे. स्वतः भास्कर जाधव यांनीच पक्षाच्या बदललेल्या कार्यपद्धतीवरून वाभाडे काढले आहेत. विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यपद्धतीवर शिवसेनेतूनच टीका होऊ लागली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी शिवसेनेची कॉंग्रेस होऊ लागल्याचा गंभीर आरोप केला आहे. पक्षाच्या बदललेल्या कार्यपद्धतीचे भास्कर जाधवांनी जाहीर वाभाडे काढले आहेत.

भास्कर जाधव ऑडिओ क्लिपमध्ये काय म्हणाले आहेत?

ज्यांनी गाव सांभाळायचं त्यांनी निवडणुकीत रुसू नये, रागवू नये म्हणून त्यांना सांभाळायची वेळ येते. बरोबर आहे ना राऊत काय अनुभव आहे तुमचा. असाच आहे ना? गावाचा सरपंच आहे त्याचा वगमान काढा. जिल्हा परिषद सदस्यांचा वगमान काढा.पंचायत समिती सदस्यांचा वगमान काढा. वगमान म्हणजे काय तुम्हाला समजतं ना की नाही समजत. त्याचा वगमान काढा शाखा प्रमुखांचा काढा...उल्फा... उल्फा काढा.. असे हे सर्व बिरुद बसले आहे उल्फा...काय चाललंय काय हे? पदाधिका-यांनी समजून जावं आमच्यावर कुणाचं लक्ष नाही, मी काय करतोय? ते तोंडावर बोलत नसतील. कारण प्रत्येकाला बरं काय वाटेल जे बोललं ते चांगलं आहे. पण त्याला खरं काय आहे हे माहीत आहे त्याची जाणीव ठेवावी. पदांचा म्हणजे शाखाप्रमुखपदाचा कालावधी निश्चित केला

# आरटीई २५% मोफत प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरावे -प्राचार्या मोरे मनीषा

गेवराई (प्रतिनिधी) कै. चि. ओमकार प्रतिष्ठान राहेरी संचलित इरा मॉडेल इंटरनॅशनल स्कूल व जुनिअर कॉलेज तलवाडा च्या प्राचार्या मोरे मनीषा यांनी महाराष्ट्र शासन प्राथमिक शिक्षण संचालनालय यांचे जावक क्रमांक आर टी ई २५%/२०२५/८०१/१०८ दिनांक १३/०१/२०२५ परिपत्रकानुसार २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षाच्या शिक्षण हक्क अधिनियमानुसार दुर्बल घटक व वंचित घटकाकरिता २५% ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेला दिनांक १४ /१/२०२५ ते २७/०१/२०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे तरी पालकांनी आपल्या पाल्यांची ऑनलाइन अर्ज २५% मोफत प्रवेशासाठी सदरील कालावधीमध्ये ऑनलाईन भरावीत. २५ टक्के मोफत



प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज पालकांनी प्रवेश अर्ज भरावेत ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी आवश्यक असणारे कागदपत्र उदाहरणार्थ दुर्बल घटकातील पालकांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र. जन्म प्रमाणपत्र. रहिवासी प्रमाणपत्र. मुलाचे किंवा मुलीचे आधार कार्ड असल्यास आधार कार्ड. वंचित घटकातील मुलासाठी वडिलांचे जात प्रमाणपत्र. मुलाचे किंवा मुलीचे जन्म प्रमाणपत्र रहिवासी प्रमाणपत्र. दिव्यांग मुलासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र जिल्हा शल्य चिकित्सक यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र ४०% इत्यादी कागदपत्र आवश्यक आहेत. तरी २५% मोफत प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता काही अडचण आल्यास कै. ची ओमकार प्रतिष्ठान राहेरी संचलित हिरा मॉडेल इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेज तलवाडा च्या प्राचार्य मोरे मनीषा यांच्याशी संपर्क ९०४९१०५००३/९५६१३२४०१३/९०११४२०७६७ या नंबर वर संपर्क करावा किंवा प्रत्यक्षात शाळेच्या वेळेत सकाळी नऊ ते तीन पर्यंत प्रत्यक्षात अडचण विचारू शकतात तरी २५% मोफत प्रवेशाचा फायदा घेण्यासाठी सर्व पालकांनी ऑनलाइन अर्ज दिलेल्या मुदतीच्या आत भरावा. असे प्राचार्य मोरे मनीषा यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकानुसार कळविण्यात आले आहे

# भगवानगडावर मंगळवारी श्री संत भगवानबाबांचा पुण्यतिथी महोत्सव

मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गोविंदजी सानप यांचा भगवानगड ट्रस्टतर्फे होणार विशेष गौरव

शेवगाव प्रशांत बाफना

महाराष्ट्रातील लाखो भाविकांचं दैवत श्री संत भगवानबाबा यांची मंगळवार दि.१४ जानेवारी रोजी ६० वी पुण्यतिथी आहे. या पुण्यतिथी सोहळ्यासाठी श्री क्षेत्र भगवानगडावर भव्य दिव्य मंडप उभारला आहे. सुमारे शंभर क्विंटल साखरेपासून महाप्रसाद बनवला आहे. वाहनांच्या पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था केलेली आहे. पुण्यतिथी निमित्ताने दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी अनेक संस्थानांहून व गावांतून लहान-मोठ्या अनेक दिंड्या श्री क्षेत्र भगवानगडावर येत आहेत. मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्रीजी यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय काटेकोरपणे सर्व देखरेख केली जात आहे.

मंगळवारी सकाळी ९ वाजता ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबांच्या समाधीची महापूजा होईल. सकाळी ११ ते १ या वेळेत काल्याचे कीर्तन व दुपारी १ वाजता महाप्रसाद वाटप करून कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

विशेष आकर्षण - महंत शास्त्रीजींचे कीर्तन

श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती तथा वारकरी संप्रदायाचे भूषण ह.भ.प.न्यायाचार्य श्री.नामदेव महाराज शास्त्रीजी यांचे कीर्तन म्हणजे रसिकांसाठी एक पर्वणीच असते.मंगळवारी श्री संत भगवानबाबा यांच्या ६० व्या पुण्यतिथी निमित्ताने महंत शास्त्रीजींचे



काल्याचे कीर्तन होणार आहे. तरी सर्व भाविक-भक्तांनी वेळेवर श्री क्षेत्र भगवानगडावर हजर राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## शासकीय जमीनीवर वर्षांनु वर्ष बोगस पिक विमा ऊचलेला आहे या तक्रारीला एक महिना ऊलटला तरीही पंचनामा नाही

# वडवणी कृषीच्या गोपाल ढाकणेचा कामात हलगर्जीपणा कारवाईची मागणी

वडवणी/ प्रतिनिधि

वडवणी शहरातील शासन जमिनिवर गट क्र २६०, २५९ वर बोगस पिक विमा वर्षानुवर्ष ऊचलेला आहे अशी तक्रार दि ६-१२-२०२४ आसतांना देखील तेथील पिक पाहणी करून अहवाल सादर करावा आशा सक्त सुचना कृषी आधिकारी यांनी देऊन त्याचं पत्रक दि २६-१२-२०२४ रोजी काढण्यात आलेलं आहे.

सविस्तर वृत आसे कि, वडवणी शहरातील शासकीय जमीनीवर गट क्र २६०, २५९ वर बोगस पिक विमा वर्षानुवर्ष भरुन ऊचलेला आहे अशी तक्रार आबासाहेब राठोड व करण



ऊजगरे यांनी दि ६-१२-२०२४ रोजी कृषी आधिकारी यांच्याकडे केलेली आहे.जिल्हा कृषी आधिकारी,ऊपविभागीय कृषि अधिकारी,तालुका विमा प्रतिनिधि यांनाही माहितीस्तव सादर आहे.तेथील कृषी आधिकारी यांनी त्यासंदर्भात पंचनामा करण्या संदर्भात आदेशही काढला आहे व आपल्या स्तरावरुन स्थळ पाहणी करुन अहवाल पाठवा मात्र कृषी विभागाचे कर्मचारी गोपल ढाकणे यांनी कामात हलगर्जीपणा करत याचा पंचनामाही केला नाही,आणी ऑफीसमध्येही भेटत नाही, तक्रारदार यांनी एक महिना भरापासुन चकरा मारल्या फोन अनेकदा ऊचलत नाहीत, त्यामुळे कामात हलगर्जीपणा केल्याच्या कारणावरुन वरिष्टांनी गोपाल ढाकणेवर कारवाई का करू नये असा पवित्रा तक्रारदारांनी घेतला आहे.

# नूतन वसाहत उड्डाणपुलवरील खड्ड्यात बेशरमाची झाडे लावून अनोखे आंदोल

## रस्ते खड्डे मुक्त करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरम आक्रमक.

डॉ आशिष तिवारी/जालना

जालना शहरातील रस्ते खड्डेमुक्त करण्याच्या मागणीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमने आक्रमक भूमिका घेत, प्रातिनिधिक स्वरूपात नूतन वसाहत उड्डाणपुलावरील खड्ड्यात बेशरमाची झाडे लावून युवक कॉंग्रेसचे प्रदेश सचिव तथा फोरमचे जिल्हाध्यक्ष शेषराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली आज मंगळवार दि. १४ जानेवारी रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास अनोख्या आंदोलन केले आणि शासन-प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी केली.


शेषराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली अचानक करण्यात आलेल्या आंदोलनात

कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत रत्नपारखे, दीपक गायकवाड, गजानन भालसकर, संदीप भिसे, सुरज चत्रे, दीपक



दहिटे, रवी कुलकर्णी यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी उड्डाणपुरावरील खड्ड्यात बेशरमाची झाडे लावून हळदी कुंकवाद्वारे खड्ड्यांची पूजा करण्यात आली. याप्रसंगी शासन- प्रशासनाच्या तीव्र घोषणाबाजी करून निषेध नोंदविण्यात आला.

यावेळी शेषराव जाधव म्हणाले की, शहरातील बहुतांश रस्ते खड्डेमय बनले आहेत. याकडे शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष आहे. खोटी आश्वासने देऊन निवडणुका लढविल्या जातात. नंतर मात्र दुर्लक्ष केले जाते. आता सर्वांना महानगरपालिका निवडणुकीची घाई झाली आहे. मग या समस्या सोडणार कोण? खड्ड्यात वाहने आदळून अनेक अपघात झाले. काहींना प्राण गमवावे लागले तर अनेकजण फ्रॅक्चर झाले, जायबंदी झाले. नूतन वसाहत उड्डाणपूलावर अनेक ठिकाणी खड्डे आहेत. जिल्हाधिकारी कार्यालय, न्यायालय, जिल्हा परिषद, तहसील कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय, धर्मादाय आयुक्त कार्यालय, जिल्हा शासकीय रुग्णालय आदी शासकीय- निमशासकीय कार्यालयाकडे जाण्यासाठी हाच एकमेव रस्ता असून, तरीदेखील उड्डाणपुलावरील या खड्ड्याकडे जिल्हाधिकारी, महानगरपालिकेचे आयुक्त आदींसह प्रतिनिधींचेही लक्ष नाही.



राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जन्मोत्सवानिमित्त बीड येथे जिजाऊ वंदन करते वेळेस ड प्रकाश कवठेकर , पुरी सर , सातपुते सर , जाधव सर आदी

# १६जानेवारी रोजी युवा कार्यप्रशिक्षणार्थी बेरोजगारांचा महामेळावा



आष्टी ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत बेरोजगार युवकांना प्रशिक्षणार्थी संधी उपलब्ध करून दिली होती, विविध शासकीय विभागात हे सर्व युवक कार्यरत असून, आपले कर्तव्य आणि जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय उत्तम प्रकारे पार पाडत आहेत, दरम्यान सर्व युवकांना शासकीय कामाचा अनुभव आणि मार्गदर्शन उत्तम प्रकारे मिळत असल्याचे युवकांचे म्हणणे आहे परंतु या प्रशिक्षणार्थचा कालावधी हा सहा महिन्याचा असल्याकारणाने येत्या फेब्रुवारी २०२५, मध्ये हा कालावधी पूर्ण होणार आहे, त्यानंतर हे सर्व युवक बेरोजगार होणार असल्याची भीती या युवकांमध्ये आहे.

महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री तसेच मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी जाहीर केल्याप्रमाणे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी ज्या अस्थापनेत कार्यरत आहेत तिथेच त्यांना नियमित करण्यात येईल,असे आश्वासन दिले होते, याचीच आठवण करून देण्यासाठी आणि इतर मागण्यांकडे देवेंद्र फडणवीस सरकारचे लक्ष वेधण्याकरिता

# पुढील मकर संक्रांतीपर्यंत ठाकरे-फडणवीस एकत्र

## आमदार रवी राणांचा मोठा दावा, म्हणाले - देवेंद्रजींना भेटून ठाकरे एक पाऊल पुढे आलेत

पुढील मकरसंक्रांतीपर्यंत उद्धव ठाकरे हे देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत दिसतील, असे वक्तव्य आमदार रवी राणा यांनी केले आहे. रवी राणा यांच्या या विधानामुळे सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. राज्याच्या परिवर्तनामध्ये उद्धव ठाकरेंनी तिळगूळ खा आणि गोड गोड बोलावे अशी विनंती आहे, असेही रवी राणा यांनी म्हटले.

राज्यात सरकार स्थापन झाल्यापासून भाजप आणि ठाकरे गटाची जवळीक वाढत असल्याचे दिसून येत आहे. विधीमंडळाच्या अधिवेशनादरम्यान उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. तर आदित्य ठाकरे हे देखील आतापर्यंत तीन वेळा देवेंद्र फडणवीसांच्या भेटीसाठी गेले होते. शिवाय ठाकरे गटाच्या 'सामना'मधून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक करण्यात आले. तसेच उद्धव ठाकरे



माझे शत्रू नाहीत, असे विधान फडणवीसांनी केले होते. या सर्व घडामोडींवर प्रतिक्रिया देताना रवी राण यांनी उपरोक्त मोठा दावा केल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.


काय म्हणाले रवी राणा?

राज्याच्या परिवर्तनामध्ये उद्धव ठाकरेंनी तिळगूळ खावे आणि गोड गोड बोलावे अशी विनंती असल्याचे रवी राणा म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांना भेटून उद्धव ठाकरे एक पाऊल पुढे आले आहेत असे म्हणत पुढच्या मकरसंक्रांतीपर्यंत उद्धव ठाकरे हे देवेंद्र फडणवीसांसोबत दिसतील, असा दावा रवी राणा यांनी केला. मोदींचे नेतृत्व उद्धव ठाकरेंनी खुल्या मनाने स्वीकारले तर नक्कीच हे होईल, असा विश्वासही राणा यांनी व्यक्त केला. देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वात महाराष्ट्र पुढे जाणार आहे. त्यांच्यात नेतृत्वात आगामी महापालिका निवडणुकीत भाजपा- युवा स्वाभिमान पक्ष रिंगणात उतरेल. कुठल्याही निवडणुकीत आम्ही एकत्रित राहू असेही आमदार रवी राणा यांनी सांगितले.

राजकारणात आज शत्रू असणारा उद्या मित्र होतो

मागील अनेक दिवसांच्या घडामोडी पाहता उद्धव ठाकरेंची भूमिका बदलतीये का असा प्रश्न उपस्थित होत आहे. याबाबत अमृता फडणवीस यांनीही भाष्य केले. नेत्यांमध्ये असणारे मतभेद हे विचारधारांबाबत आहेत. त्यांच्या वैयक्तिक पातळीवर ते मतभेद नाहीत. वैचारिक मतभेद असल्याने राजकारणात एकेकाळचा शत्रू असणारा हा मित्र होतो, मग परत शत्रू होतो, परत मित्र होतो अशी कितीतरी उदाहरणे आहेत, असे सूचक विधान अमृता फडणवीस यांनी केले होते.

# नायलॉन मांजा अखेर पोलिसांच्याच गळ्यावर; पीएसआयचा गळा कापला, प्रकृती गंभीर




छत्रपती संभाजीनगर : कर्तव्यावर निघालेल्या पीएसआयचा नायलॉन मांजामुळे गळा कापला गेला. बीड बायपास परिसरातील सुधाकरनगर मध्ये सकाळी दहा वाजता घडलेल्या घटनेत पीएसआय गंभीर जखमी झाले आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमी सचिन पारधे हे स्थानिक गुन्हे शाखेत अधिकारी आहेत. मंगळवारी सकाळी दहा वाजता ते नेहमीप्रमाणे कर्तव्यावर दुचाकीने निघाले होते. सुधाकर नगर मधून जात असतानाच अचानक मांजाने त्यांचा गळा कापला गेला. स्थानिकांनी धाव घेत त्यांना तत्काळ एका खाजगी रुग्णालयात दाखल केले.

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, ही घटना इतकी गंभीर होती की पारधे यांच्या गळ्याला मांजा लागताच रक्ताच्या धारा निघाल्या. दुचाकीवरून तोल जाऊन ते खाली कोसळले. मांजा त्यांच्या गळ्यामध्ये अक्षरशः रुतला होता.

तातडीने शस्त्रक्रिया

शहानुरमिया दर्गा परिसरातील एका खाजगी रुग्णालयात पारधे यांच्यावर तातडीने शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. प्राथमिक माहितीनुसार त्यांची प्रकृती अद्यापही चिंताजनक आहे.

### ३१ गुन्हे तरीही मांजा सुसाट

शहर पोलिसांनी गेल्या दीड महिन्यांमध्ये ३१ गुन्हे दाखल करत ४०० पेक्षा अधिक रील जप्त केल्या. मात्र तरीही शहरात सोशल मीडिया व ऑनलाइन वेबसाईट वरून नायलॉन मांजा खरेदी करण्यात आला. या बेजबाबदार नागरिकांमुळे जवळपास ४० पेक्षा अधिक नागरिक आत्तापर्यंत गंभीर जखमी झाले आहेत.




## मेड - एक्सेलंसं मध्ये NEET, १२ वी च्या विदयार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

बीड येथील मेड-एक्सलन्स क्लासेस मध्ये NEETची तयारी करणाऱ्या इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ संपन्न झाला. या वेळी विद्यार्थ्यांना शेख आलीया सिद्दीखा रिटायर्ड मुख्याध्यापिका, हसनाद सर, समीर फारोकी रेहनुमा क्लासेस मुजाहेद सर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या समारंभासाठी बागवान नसरीन मॅडम व खान मेहजबीन मॅडम अपस्थित होत्या. यावेळी पाहुण्यांचे क्लासेसचे संचालक विखार सर, शेरकर सर आणि शोएब सर यांनी आभार व्यक्त केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार दिन उत्साहात साजरा

## बहुजन विकास मोर्चाच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

परळी ।प्रतिनिधी

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार दिन परळी शहरातील भीमवाडी, रोडे चौकात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानंतर जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत बहुजन विकास मोर्चाच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.नामविस्तार दिनानिमित्त रोडे चौकात जेष्ठ नेते अनिल मस्के व कामगार नेते आर.एच.व्हावळे व माजी नगरसेवक महेंद्र रोडे यांच्या हस्ते



ध्वजारोहण करण्यात आले.तसेच उपस्थित मान्यवर नामांतर लढ्यातील योध्दा यांच्या हस्ते विद्यापीठ कमानीच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी नामांतर लढ्यातील योध्दे सोपान ताटे, सुरेश रोडे,माजी नगरसेवक महेंद्र रोडे.माजी नगरसेवक रवी मुळे,बहुजन विकास मोर्चा परळी तालुका अध्यक्ष मनोहर मुंडे,एकतावादी रिपाईचे शहराध्यक्ष सुनील कांबळे, जेष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड, प्रदीप भोकरे, भगवान गायकवाड, जेष्ठ मार्गदर्शक कांबळे,वाले आदी उपस्थित होते.दरम्यान बहुजन विकास मोर्चाच्या वतीने जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.



## दोन दिवसांपूर्वी लग्न ठरलं, बहिणीला भेटायला आला, नाशिकमध्ये युवकाचा काळाने घात केला!

लग्न ठरल्यानंतर बहिणीला भेटायला आलेल्या २३ वर्षांच्या भावाचा हृदयद्रावक शेवट झाला आहे. नाशिकमध्ये घडलेल्या या घटनेमुळे हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.नायलॉन मांजामुळे गळा चिरला गेल्यामुळे २३ वर्षांच्या सोनू धोत्रे याचा मृत्यू झाला आहे. रक्तबंबाळ अवस्थेमध्ये सोनूला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं.

मृत्यू झालेला सोनू धोत्रे आपल्या बहिणीच्या भेटीसाठी गुजरातहून नाशिकला आला होता, मात्र बहिणीची भेट होण्यापूर्वीच मांजाने त्याचा जीव घेतला. सोनीच्या अकस्मात मृत्यूने त्याच्या कुटुंबियांना मोठा धक्का बसला आहे.दोनच दिवसांपूर्वी सोनूचं लग्न ठरलं होतं. मे महिन्यामध्ये त्याच्या लग्नाची तारीखही निश्चित झाली होती, त्यामुळे धोत्रे कुटुंबामध्ये आनंदाचं वातावरण होतं.

# पानिपत शौर्य स्मारकाच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाचे सर्वोतोपरी सहकार्य - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा साकारणार पुतळा उभारणीसाठी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल समन्वयक

नवी दिल्ली ।प्रतिनिधी

मराठयांनी राष्ट्र संरक्षणार्थ पानिपतच्या युध्दात जीवाची बाजी लावून लढा दिला. या युद्धाच्या शौर्य स्मारकासाठी महाराष्ट्र शासन सर्वोतोपरी सहकार्य करेल,अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पानिपत येथे दिली.पानिपत युध्दाला २६४ वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने पानिपत येथील काला आम परिसरात आज मराठा शौर्य दिनाचे आयोजन करण्यात आले. मराठा वीर योद्ध्यांना अभिवादन करण्यासाठी गत १९ वर्षांपासून पानिपत शौर्य समितीच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

याप्रसंगी केंद्रीय आरोग्य राज्य मंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय क्रीडा तथा युवा कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्याचे राजशिष्टाचार तथा पणन मंत्री जयकुमार रावल, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, खासदार राजाभाऊ वाझे आणि हरियाणा



शासनाचे अधिकारी, स्थानिक नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या युध्द मोहिमेतून त्याकाळी बरेच काही शिकता आले. त्यानंतर झालेल्या अनेक मोहिमा मराठयांनी जिकंल्याच नाही तर अटकेपर्यंत झेंडा फडकविला. छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राला जाती पातीपलीकडे देशासाठी लढण्याची दिलेली शिकवण मावळयांनी पाळली आणि म्हणून दिल्लीचे तख्त मराठयांनी एका काळी राखले. ही एकीची शिकवण कायम ठेवून विकसित महाराष्ट्र आणि भारत घडवूया असेही ते म्हणाले.

या स्मारकासाठी अधिकची जमीन आवश्यक असल्याने त्यासाठी महाराष्ट्र शासन सर्वोतोपरी सहकार्य करेल, असे नमूद करुन या परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळाही राज्य शासनातर्फे उभारला जाईल, अशी घोषणाही मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी केली. यासाठी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल समन्वयक म्हणून काम पाहतील, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि माजी मंत्री रावसाहेब दानवे पाटील यांनीही मनोगते मांडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पानिपत शौर्य समितीचे अध्यक्ष प्रदीप पाटील यांनी केले. यावेळी. समितीच्यावतीने अमरावतीचे नितीन धांडे यांना शौर्यस्मारक पुरस्कार प्रदान करण्यातं आला.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT